(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# कोरोना महामारीचे भारतातील राजकीय परीणाम

**सहा. प्रा. धर्मवीर शाहू क्षीरसागर**

राज्यशास्त्र विभाग, ए.सी.एस. कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**प्रस्तावना:**

सद्या कोवीड १९ या विषाणूमुळे निर्माण झालेली भयावह परीस्थिती मानवी अस्तित्वाच्या संघर्षातील ऐतिहासीक घटना मानावी लागेल. या जागतीक संकटाचा सामना करताना अमेरीकेसह जगातील लहान मोठया देशांची दमछाक होताना दिसते आहे. जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना संकटाला जागतीक महामारी घोषित केले आहे. या विषाणूचा वाढता प्रसार अनेक देशाची चींताजनक ठरत आहे. नागरीकांचे प्राण वाचवयाचे की अर्थव्यवस्थेचा डोलारा सावरायचा या पेचात देश अडकले आहेत. या संकटाचे विविधांगी सकारात्मक व नकारात्मक परीणाम समोर येत आहेत. या महामारीसाठी अमेरीका व चीन हया बडया सत्ता एकमेकाला जबाबदार धरीत आहेत. हे नैसर्गिक वा मानवनिर्मित संकट आहे याबाबत निश्चितपणाने आत्ताच काही बोलता येत नसले तरी गोंधळाची परीस्थिती निवळल्यावर सत्य उजेडात येईल. देशांमधली स्थिती सांभाळताना . या संकटाचा सामना करताना राज्याची धांदल उडत आहे, प्रस्तापीत व्यवस्थेला खीळ बसली असून सर्वच क्षेत्रात प्रश्नांची शृखला तयार होताना दिसत आहे. युरोप व अमेरीकेमध्ये या महामारीचे भयंकर दुष्परीणाम दिसुन येत आहेत. अवाढव्य लोकसंखेच्या दृष्टीने या विषाणूचा प्रसार रोखणे भारतापुढे मोठे आव्हान बनले आहे. सदर शोध निबंधामध्ये कोरोना संकटामुळे निर्माण झालेले भारतातील राजकीय परीणाम समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उदिद्ष्टे:**

१. कोरोना या जागतीक संकटाविषयी माहीती जाणून घेणे.
२. कोरोना महामारीचे भारतातील राजकीय परीणाम समजून घेणे.

**गृहितके:**

१. कोरोमुळे मानवजातीपुढे भयंकर संकट निर्माण झाले आहे.
२. कोरोना महामारीमुळे भारतात स्थानिक पातळी ते देश पातळी पर्यंत विशिष्ट राजकीय परीणाम दिसून येत आहेत.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब केला असून तथ्य संकलनासाठी व्दितीय माहीतीस्त्रोतांतर्गत, अनुशांगीक वेबसाईडस्, वर्तमानपत्रातील लेख यांचा आधार घेतला आहे.

**कोरोना महामारी एक जागतीक संकट:**

कोरोना हे एक विशिष्ट प्रकारच्या विषाणूचे कुटंब आहे ज्यामुळे प्राणी किंवा मनुष्यामध्ये विविध आजार निर्माण होतात. हे आजार बहूतांशी श्वसन व सर्दीशी निगडीत असतात. नुकताच कोवीड १९ या आजाराशी निगडीत नवीन विषाणू अस्तित्वात आला आहे. कोवीड १९ हा एक नवीन संसर्गजन्य आजार असून याची ओळख डिसेंबर २०१९ मध्ये सर्वप्रथम जगाला झाली. कोवीड १९ चा पहिला रूग्ण चीनमधील वुहान शहरात सापडला. या आजाराला जागतीक आरोग्य संघटनेने जागतीक महामारी घोषित केले. आज रोजी संपूर्ण जगात २१५ राष्ट्रांमध्ये एकुण ३४ लाख ८९ हजार ५३ एवढे कोरोना बाधीत रूग्ण असुन २ लाख ३९ हजार ५५९ लोकांचा मृत्यू झाला आहे. **१** भारतामध्ये ३० जानेवारी २०२० पासून ४ मे २०२० पर्यंत ४२ हजार ५३३ एवढी रूग्ण संख्या झाली असून १ हजार ३७३ एवढया लोकांना आपला प्राण गमवावा लागला आहे. **२** ताप, कोरडा खोकला, श्वसनास त्रास ही या आजाराची सामान्य लक्षणे आहेत. याशिवास डोकेदुखी, अतिसार, चव व गंध शक्ती हरवणे ईत्यादी लक्षणेही नव्याने समोर आल्याचे जागतीक आरोग्य संघटनेने जाहिर केले आहे.

व्यक्तीच्या शिंकेतून, खोकल्यातून किंवा बोलन्यातून तोंडावाटे बाहेर पडणाऱ्या थुंकीतून हे विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये नाक किंवा तोंडावाटे संक्रमित होतात. हा विषाणू जमीनीवर किंवा वस्तूवर पडून राहतो त्याच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तीला डोळे, नाक व तोंडाद्वारे संक्रमीत होतो. १ ते १४ दिवसाच्या कालावधीत आजाराची लक्षणे दिसू लागतात. वयस्क व्यक्ती, मधुमेह, ब्लड प्रेशर, हृदय अथवा फुफूस विकार, कॅन्सर बाधीत रूग्णांना या आजारापासून अधिक धोका असल्याचे समोर आले आहे. एक पंचमास लोकांनाच अधीक तिव्र त्रास होण्याचा धोका असल्याचे स्पष्ट झाले आहे. या संक्रमणापासून बचाव करण्यासाठी व्यक्ती — व्यक्तीमध्ये किमान एक मिटरचे शारीरीक अंतर असावे, आपले हात नियमित साबण व पाण्याने धूवावेत, अल्कोहोल आधारीत सॅनिटायझरने हात चोळावेत. या शिवाय मास्क वापरणे, शिंकतांना किंवा खोकताना कोपराचा अथवा टिश्यूचा वापर करावा, डोळे नाक व तोंडाला हात लावणे टाळावे असे उपाय जागतीक आरोग्य संघटनेकडून सांगीतले गेले आहेत. या विषाणूचा प्रसार काही कुत्री व मांजरामध्ये संक्रमित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र प्राण्यापासून माणसामध्ये संक्रमण झाल्याचा पुरावा अजून समोर आला नसल्याचे जागतीक आरोग्य संघटनेने स्पष्ट केले आहे. **३**

कोवीड १९ संदर्भात जागतीक आरोग्य संघटनेच्या समन्वयाने जगभरात विविध ठिकाणी संशोधन सुरू आहे. अद्याप यावर ठोस औषध अथवा लस सापडलेली नाही. या आजाराचा फैलाव प्रचंड वेगाने जगभरात होतो आहे. प्रसार रोखण्याचे सर्वात प्रभावी तंत्र म्हणून लॉकडाऊनचा वापर केला जातो आहे. सर्वप्रथम चीनने वुहान शहरात या तंत्राचा वापर करून फैलाव नियंत्रणात आणला. जागतीक पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत शासनव्यवस्था विविध प्रयोग करीत आहेत. या संकटामुळे विविध सामाजिक, आर्थिक व राजकीय परीणाम दिसून येत आहेत.

**कोरोना महामारीचे भारतातील राजकीय परीणाम:**

भारतामध्ये ३० जानेवारी २०२० रोजी केरळ मध्ये कोवीड १९ ची पहिला रूग्ण सापडला. आज रोजी ३१ हजार ९६७ ॲक्टीव केसेस असून १५८३ लोक मृत्युमुखी पडले आहेत तर १३ हजार १६० रूग्ण बरे झाले आहेत. **४** महाराष्ट्रात सर्वाधिक रूग्ण असून गुजरात, दिल्ली, तामिळनाडू, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल व पंजाब ही राज्य प्रभावीत झाली आहेत. महाराष्ट्रातील मुंबई व पुणे ही सर्वाधिक संवेदनशील ठिकाणे बनली असून दिवसेदिवस बाधीतांचा वाढता आकडा चिंताजनक बनतो आहे. यावर मात करण्यासाठी शासन व प्रशासन पातळीवर अटोकाट प्रयत्न केले जात आहेत. भारतात लॉकडाऊनच्या तंत्राचा अवलंब केला गेला आहे. दिनांक २४ मार्च २०२० ते १४ एप्रील २०२०, १५ एप्रील २०२० ते ३ मे २०२० आणि ४ मे २०२० ते १७ मे २०२० पर्यंत तीन वेळा संपूर्ण लॉकडाउन लागू केला आहे. तिसऱ्या लॉकडाऊनमध्ये बाधीतांच्या संख्येच्या आधारावर जिल्हानिहाय रेड, ऑरेंज व ग्रीन असे प्रकार केले आहेत. त्यानुसार सवलतींची रूपरेषा निश्चित केली आहे. भारतील समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्था ढवळून निघाली आहे. प्रस्तूत शोधनिबंधात कोरोना महामारीमुळे निर्माण झालेल्या राजकीय परीणामांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर देशातील राज्य सरकारे अधिक सक्रिय झालेले दिसून येत आहेत. सर्वप्रथम मध्यप्रदेश सरकारने २५ जानेवारी २०२० मध्ये राज्यात सल्लागार समिती स्थापन करून सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना याबाबत शिक्षित होण्याचे आदेश दिले आणि २८ जानेवारी २०२० पासून चीन, जपान व थायलंड देशातून आलेल्या प्रवाशांची तपासणी करण्यास सुरूवात केली. त्यानंतर चीनमधून आलेल्या ७८ लोकांना तामिळनाडू सरकारने ३० जानेवारी २०२० रोजी कॉरंटाईन अर्थात अलगीकरणात ठेवले. ३० जानेवारी २०२० ला केरळामध्ये पहिली कोरोना केस आढळून आल्यानंतर सरकारने केरळमध्ये हाय अलर्ट घोषित केला. ५ मार्च २०२० रोजी दिल्ली सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून सर्व प्राथमिक शाळा

तर केरळ सरकारने १० मार्चपासून सर्व शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. १३ मार्च २०२० रोजी महाराष्ट्र सरकारने साथीचे आजार, १८९७ या कायद्यातील तरतूदी पुणे, पिंपरी चिंचवड, मुंबई, नवी मुंबई व नागपूर शहरांना लागू केल्या. पुढे कर्नाटक राज्याने केरळच्या सीमा वाहतूकीसाठी बंद केल्या. १९ मार्च २०२० रोजी राजस्थान सरकारने राज्यात कलम १४४ नुसार संचारबंदी लागू केली. २३ मार्चपासून महाराष्ट्र सरकारने सर्व जिल्हयांच्या सीमा परस्परांसाठी बंद केल्या. ५

दिनांक २२ मार्च २०२० रोजी केंद्र सरकारची पहिली प्रतिक्रिया जनता कर्फ्यूच्या रूपाने समोर आली. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर राजकीय निर्णयप्रक्रियेत वेगवान घडामोडी घडत असून केंद्रसकारपेक्षा राज्य सरकारे अधिक सजग असल्याचे दिसून येत आहे.

भारतातील कोरोना संकटाला तबलिगी प्रकरणावरून धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न झाल्याचे स्पष्ट जाणवते. ३ मार्च २०२० पासून तबलिगी जमातच्या परीषदेला दिल्लीतील निजामुदि्नमध्ये सुरूवात झाली या धार्मिक कार्यक्रमामध्ये जगातील २५० परदेशी नागरीक सामिल झाले ज्यामुळे इतर सहभागींमध्ये कोवीड १९ चे संक्रमण झाले हे सहभागी भारतातील विविध कानाकोपऱ्यात पोहोचले आणि भारतात कोरोनाचा वेगाने प्रसार झाल्याची चर्चा देशभर वाढत गेली. याबाबत विविध मते जनमानसात माध्यमाद्वारे पोहोचत गेली जसे की, हा एक इस्लामिक दहशतवादाचा डाव आहे. यामागे पाकिस्थानचा हात आहे. यावरून धार्मिक राजकारण सुलगविण्याचा प्रयत्न झाला. काही मुस्लिम तरूणांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून हा अल्लाहाचा कहर असल्याचे व्हिडीओ वायरल केले. विविध राजकीय नेत्यांनी याबाबत प्रतिक्रीया देताना वातावरण अधिक गरम करण्याचा प्रयत्न केला एकूणच लोक मुस्लिम समाजाकडे संशयीत नजरेने पाहू लागले यातूनच पालघर येथे तीन साधूंची जनसमुदायांकडून पोलिसांसमक्ष ठेचून हत्या करण्यात आली. भारतात कम्युनल कोरोनाचे राजकारण घडून आले.

कोरोना महामारीच्या निमित्ताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भुमिकेबाबत राजकीय चर्चाविश्वात संमिश्र प्रतिक्रीया उमटल्याचे निदर्शनास आले. मोदी यांनी थाळी वादन व दिवे लावन या लोककार्यक्रमातून भारतीयांना एकसंघपणे या संकटाचा सामना करण्याचे भावनीक आवाहन केले. अशा भावनीक कार्यक्रमापेक्षा कोरोना टेस्टिंग वाढवणे, राज्यांना आर्थिक साहय देणे, वैद्यकीय सेवा सुविधा वाढवणे व अर्थव्यवस्थेतील उर्जा टिकवणे, लॉकडाऊनच्या काळात निर्माण झालेल्या विस्तापीत व निर्वासितांचे प्रश्न सोडवणे याबाबत ठोस निर्णय घेणे अपेक्षित असल्याचे विरोधी पक्षकारांचे बोलले गेले याबाबत राहूल गांधी यांची रघूराम राजन यांच्यासोबत झालेली व्हिडीयो कॉन्फरंसींग लक्षणीय ठरली. अमेरीकेला हायडोक्लोरोफीन देण्याचा नरेंद्र मोदीचा निर्णय अमेरीकेच्या दबावापोटी घेतल्याचे समोर आले.

कोरोनाच्या पार्श्वभुमीवर देशपातळीवर घेतलेल्या लॉकडाऊनमुळे स्थलांतरीतांचा प्रश्न गंभीर बनला आहे. विविध राज्यात लाखो लोक अडकुन पडले आहेत. त्यांचा निवास व भोजनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने परदेशात अडकलेल्या भारतीय नागरीकांना भारतात आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. मात्र देशातंर्गत स्थलांतरीतांच्या प्रश्नांकडे म्हणावे तसे लक्ष देण्यात सरकारे अपयशी ठरली आहेत. रेल्वे, बसेस व इतर वाहनांच्या वाहतूकीवर बंदी असल्याने अनेकांना आपल्या मुळ गावी जाण्यासाठी छुप्या मार्गांचा वापर करीत आहेत. कायदा व सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीचा बोजवारा उडत आहे. अनेक मजूर, कामगार शेकडो मैल पायी प्रवास करीत आहेत. रेल्वे लाईन मार्गे गावी जाण्याचा मार्ग निवडल्यामूळे जालना – औरंगाबाद रेल्वे ट्रॅकवर मध्यप्रदेशाकडे निघालेल्या १६ कामगारांना आपला जीव गमवावा लागला आहे. लॉकगाऊनच्या तिसऱ्या टप्प्यात सरकारने स्थलांतरीसाठी तात्पुरत्या रेल्वेची व्यवस्था केली आहे. या निर्णयाला उशिर झाल्याने अनेक स्थलांतरीतांना हालअपेष्टांचा सामना करावा लागतो आहे. दरम्यान स्थलांतरीतांनी केलेल्या गर्दीमुळे कोरोना संसर्ग वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे

कोरोना महामारीच्या पार्श्वभुमीवर घटकराज्यातील राजकीय नेतृत्वासमोर विविध समस्यांची साखळी निर्माण झालेली दिसते. नागरीकांचा संक्रमनापासून बचाव करणे, लॉकडाऊनची काटेखोरपणे अमंलबजावणी करणे, तात्काळ वैद्यकीय सेवा पुरविणे, संशयीतांचे संस्थात्मक विलगीकरण करणे, अत्यावश्यक सेवा जसे की अन्नधान्य, भाजीपाला, दुध, फळे ईत्यादी सुरू ठेवणे किंवा तातपुरत्या काळासाठी बंद करणे, स्थलांतरीत कामगार व मजुरांच्या उपजीवीकेचा प्रश्न हाताळणे, कोरोना महामारीचा प्रश्न हाताळणारे डॉक्टर्स, नर्सेस, इतर वैद्यकीस स्टाफ, पोलिस प्रशासन यांच्या जीवताच्या सुरक्षेचा प्रश्न हाताळणे, या सर्वांसाठी लागणाऱ्या निधीची व्यवस्था करणे अशा अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नावर जलदगतीने निर्णय घ्यावे लागत आहेत. यातून केंद्र आणि राज्यातील बेबनाव व असहकार्य समोर येत आहे उदा. महाराष्ट्राकडून केंद्र सरकारकडे केलेली निधीची मागणी. एकुणच एका प्रश्नातून दुसऱ्या प्रश्नाचा जन्म होतो आहे यावर उत्तर शोधण्याचे मोठे आव्हान राजकीय नेतृत्वापुढे उभे राहताना दिसत आहे.

कोरोना महामारीच्या संकटाच्या पार्श्वभुमीवर लोकांना राज्याच्या मुलभूत अपरीहार्यतेची जाणिव होत आहे. राज्याच्या उत्पत्तीचे अनेक सिध्दांत मांडले गेले आहेत. बहूतांश उत्पतींमध्ये व्यक्तीच्या जीवीताचे रक्षण ही राज्याची प्राथमिक जबाबदारी मानली गेली आहे. खाजगीकरणामुळे राज्याच्या प्रभावाचा होत असलेला संकोच किती धोकादायक ठरू शकतो हे लक्षात येत आहे. सामुहिक अस्तित्व व कल्याणासाठी राज्याच्या सक्षमीकरणाची निकड सरकारी आस्तापनांच्या कार्यावरून लक्षात येताना दिसत आहे. या संकटसमयी खाजगी यंत्रणा कुचकामी ठरताना दिसत आहेत. वैद्यकिय सेवा व सार्वजनीक वाहतूक सेवांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. कोरोना महामारीच्या निमित्ताने सरकारी आस्थापनांच्या कार्यात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले आहे. वैद्यकीय व पोलिस प्रशासनातील कर्मचाऱ्यांना जीकरीचे कार्य करावे लागत आहे. अनेकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. कायद्याची अमंलबजावणी करताना पंजाबमध्ये लोकांकडून एका पोलिसांचा हात कापून टाकल्याची घटना घडली आहे. नर्सेस व डॉक्टरांना शेजाऱ्यांकडून राहत्या घरातून दुसरीकडे जाण्याचा दबाब टाकला जात आहे. आस्थापनांतील मनुष्यबळ अपुरे पडताना दिसत आहेत. सरकारचे कायमस्वरूपी नोकरभरतीबददलचे उदासिन धोरण यासाठी कारणीभूत ठरले आहे.

कोरोना संकटामुळे सत्ताकराणाच्या राजकारणाला अल्पसा ब्रेक लागल्याचे दिसून येत आहे. दरम्यान मध्यप्रदेशातील सत्ताबदल ही एकमेव लक्षणीय घटना मानावी लागेल. याशिवाय निवडणूक आयोगाला विविध राज्यातील स्थानिक निवडणूकांचा निश्चित कार्यक्रम पुढे ढकलावा लागला आहे.

हितसंबधी गटांचे स्वरूप विस्कळीत झालेले दिसून येत आहे. हा एक तात्पूरता राजकीय परीणाम असला तरी पारंपारीक हितसंबंधी गट व त्यांचे स्वरूप काहीसे बदलेले निदर्शनास येत आहेत. विविध हितसंबंधी गट आपले मुळ हितसंबंध दुर ठेवुन केवळ विशिष्ठ भौगोलिक क्षेत्रापूरते बंदिस्त होताना दिसत आहेत. उदा. पुर्वीचा दुधउत्पादक हा सद्या आपल्या गावाच्या सुरक्षेचा विचार करताना दिसतो आहे. गावे, तालुके, जिल्हे, व राज्य अशी कोरोना पासुन बचाव करणारी एक क्षेत्रीय हितसंबंधी रचना निर्माण झाल्याचे दिसून येते आहे.

कोरोना संकटामुळे विचारप्रक्रियेचे वलय केवळ जीवीताच्या रक्षणापूरते केंद्रीत झालेले दिसते आहे. या संकटकाळापुर्वी भारतात चालू असणारी सी.ए.ए. व एन.आर.सी विरोधातील जनआंदोलनाला खीळ बसली आहे. राजकीय प्रक्रियेत प्रश्नावर डिजीटल विरोधाचे व काही रस्त्यावरील तूरळक विरोधाचे प्रयत्न होताहेत, जसे की दारू विक्रिबंदी निवेदने किंवा स्थलांतरीतांच्या प्रश्न याबद्दलचे निवेदने.

**निष्कर्श:**

कोरोनाबाबत जगभरातील चीत्र मानवजातीसाठी भयावह बनत चालले आहे. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर राजकीय निर्णयप्रक्रियेत वेगवान घडामोडी घडत असून केंद्रसकारपेक्षा

राज्य सरकारे अधिक सजग असल्याचे दिसून येत आहे. भारतातील कोरोना संकटाला तबलिगी प्रकरणावरून धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न झाला आहे. कोरोना महामारीच्या निमित्ताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भुमिकेबाबत राजकीय चर्चाविश्वात संमिश्र प्रतिक्रीया उमटल्याचे निदर्शनास आले. अमेरीकेला हायडोक्लोरोफीन देण्याचा निर्णय अमेरीकेच्या दबावाखाली घ्यावा लागला आहे. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर देशपातळीवरील लॉकडाऊनमुळे स्थलांतरीतांचा प्रश्न गंभीर बनला आहे. घटकराज्यातील राजकीय नेतृत्वासमोर विविध समस्यांची साखळी निर्माण झालेली होत आहे. सामुहिक अस्तित्व व कल्याणासाठी राज्याच्या सक्षमीकरणाची निकड सरकारी आस्तापनांच्या कार्यावरून लक्षात येताना दिसत आहे. या संकटसमयी खाजगी यंत्रणा कुचकामी ठरताना दिसत आहेत. कोरोना संकटामुळे सत्ताकरणाच्या राजकारणाला अल्पसा ब्रेक लागल्याचे दिसून येत आहे. विविध हितसंबंधी गट आपले मुळ हितसंबंध दुर ठेवुन केवळ विशिष्ठ भौगोलिक क्षेत्रापूरते बंदिस्त होताना दिसत आहेत. गावे, तालुके, जिल्हे, व राज्य अशी कोरोना पासुन बचाव करणारी एक क्षेत्रीय हितसंबंधी रचना निर्माण झाल्याचे दिसून येते आहे. राजकीय प्रक्रियेला खीळ बसली आहे.

**संदर्भसुची:**

1.https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019,5.5.2020,4.47 pm

२https://covid19.who.int/region/searo/country/in , 5.5.2020,4.52 pm

3 https://www.who.int/news-room/q-a-detail/q-a-coronaviruses , 5.5.2020,5.32 pm

4 https://www.mohfw.gov.in/index.php , 5.5.2020,6.07 pm

5https://en.wikipedia.org/wiki/Indian_local_government_response_to_the_COVID-19_pandemic , 6.6.2020,12.15pm